Claim your Gemini student plan

Google Gemini: Claim your student plan for 1 year at no cost.





# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक २५८ * नांदेड * सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# दुष्काळाच्या ट्रिगर -३ मध्ये गरजेनुसार उर्वरित तालुकेही समाविष्ट करू -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## 'दुष्काळी परिस्थितीचा सामना करताना मदतीपासून कुणीही वंचित राहणार नाही'

**नागपूर (प्रतिनिधी)–** राज्यात अपुऱ्या पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये समावेश न झालेल्या तालुक्यांची तपासणी करून ट्रिगर तीन अंतर्गत मदत देण्यात येईल, दुष्काळी परिस्थितीमध्ये मदतीपासून कुणीही वंचित राहणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

राज्यातील दुष्काळी परिस्थिती व शासनातर्फे जाहीर करण्यात आलेल्या उपाययोजनांबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी माध्यमांसोबत संवाद साधला.

पर्जन्यमानाची तूट व अन्य घटकांनी प्रभावित झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती जाहीर करण्यात आली असून, या तालुक्यांमध्ये १२ उपाययोजना व सवलती लागू करण्यात आल्या आहेत. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शेत पिकाच्या नुकसानीची मदत विहित कार्यपद्धतीची पूर्तता करून दिली जाईल, अशी ग्वाही देताना मुख्यमंत्री म्हणाले की, ज्या तालुक्यांचा समावेश झाला नाही अशा सर्व तालुक्यांची तपासणी करून ट्रिगर तीनमध्ये समावेश करण्यात येईल.

दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेबद्दल बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, प्रत्येक जिल्ह्याचा आराखडा तयार करण्यात आला असून त्यानुसार पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्यात येईल. राज्यातील बहुतांश प्रकल्पात पिण्याचे पाणी उपलब्ध असून जुलै ऑगस्टपर्यंत पिण्याच्या पाण्याचे आरक्षण ठेवून अतिरिक्त उपलब्ध असलेले पाणी व पाण्याच्या उपलब्धतेनुसार रब्बीसाठी देता येईल



का याचाही प्राधान्याने विचार करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अल निनोमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा अभ्यास करण्यात येऊन फेब्रुवारी अखेरपर्यंत उच्चांक पातळी गाठण्याची शक्यता आहे, अशा परिस्थितीचा सामना करण्यासाठी आवश्यक उपाययोजना प्राधान्याने पूर्ण करण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्यात येत असल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

### एल निनोच्या परिणामाची तीव्रता आणखी वाढेल

राज्यातील ७५ टक्के भागात सरकारकडून दुष्काळाची घोषणा केल्यामुळे आगामी काळात महाराष्ट्रात शेती आणि पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवण्याची दाट शक्यता आहेत. अशातच पुढच्यावर्षीही मान्सूनसाठी प्रतिकूल असणाऱ्या एल निनोचा प्रभाव कायम राहू शकतो, असे अंदाज वर्तविले जात आहेत. मुळात आता जो अल निनो आहे हा अजून शिगेला पोहोचणार आहे. तज्ज्ञांच्या मतानुसार फेब्रुवारीत तो पीकला जाईल. फेब्रुवारीनंतर तो खाली येईल, अशी साधारण परिस्थिती आहे. आपल्याला सगळ्या प्रकारच्या तयारीत राहावे लागेल. अल निनोचा इफेक्ट वाढला तर आपल्याला ज्या अडचणी येतील त्यासाठी राहावे लागेल, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

# अटक करण्यात आलेले दोन्ही उमेदवार परीक्षेत टॉपर

## एमपीएससी औषध निरीक्षक पेपरफुटीप्रकरणी धक्कादायक खुलासा

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अन्न व औषध प्रशासनातील औषध निरीक्षक परीक्षा पेपरफुटी प्रकरणात मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने आणि विशेष तपास पथकाने मोठी धडक कारवाई केली आहे. परीक्षेपूर्वीच प्रश्नपत्रिका मिळवून अंतरिम गुणवत्ता यादीत अव्वल क्रमांक पटकावणाऱ्या दोन टॉपर उमेदवारांसह दोन मध्यस्थांना गुन्हे शाखेने बेड्या ठोकल्या आहेत. या नव्या अटकेमुळे या घोटाळ्यातील एकूण आरोपींची संख्या आता ११ वर पोहोचली आहे.

तपासात उघड झालेली माहिती अत्यंत धक्कादायक आहे. अटक करण्यात आलेला आरोपी उमेदवार साजिद संदे हा लेखी परीक्षेत १५२.५० गुण मिळवून अंतरिम गुणवत्ता यादीत तिसऱ्या स्थानी होता. तर दुसरा आरोपी विजय किंगर याने १५६ गुण मिळवून चौथा क्रमांक पटकावला होता. याआधी अटक करण्यात आलेली ऋतुजा पाटील हिने देखील १५५ गुण मिळवून गुणवत्ता यादीत सातवे स्थान पटकावले होते. अव्वल गुण मिळवणारे हेच उमेदवार आता गुन्हे शाखेच्या जाळ्यात अडकले आहेत.

गुन्हे शाखेने दिलेल्या माहितीनुसार, साजिद संदे याला सांगोला येथून तर विजय किंगर याला बुलढाणा येथून ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच या प्रकरणात मध्यस्थाची भूमिका बजावणाऱ्या संदीप खलाटे आणि भैरवनाथ कदम या दोघांना नवी मुंबई परिसरातून अटक करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, संदीप खलाटे हा सेल्स टॅक्स इन्स्पेक्टर असून भैरवनाथ कदम हा भारतीय नौदलात सिव्हिल टेक्निशियन म्हणून कार्यरत असल्याची माहिती समोर आली आहे.

एमपीएससीचे अवर सचिव अभिजीत लेंडवे याने मध्यस्थांमार्फत हा पेपर फोडल्याचे तपासात निष्पन्न झाले होते. या प्रकरणात याआधी अवर सचिव अभिजीत लेंडवे, गोपनीय कक्षात काम करणारा समन्वय अधिकारी विश्वेश्वर नकाते, सहाय्यक कक्ष अधिकारी गोपाळ मराठे, कौटिल्य अकॅडमीचा संचालक प्रवीण पाटील यांच्यासह मध्यस्थ अमृत पाटील, लोकेश उर्फ गौरव पाटील आणि उमेदवार ऋतुजा पाटील यांना अटक करण्यात आली होती. सर्व आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.

एमपीएससीतर्फे अन्न व औषध प्रशासनातील औषध निरीक्षक, गट-ब संवर्गातील एकूण १५४ पदांसाठी २२ मार्च २०२६ रोजी महाराष्ट्रातील ६ विविध परीक्षा केंद्रांवर परीक्षा आयोजित करण्यात आली होती. या परीक्षेदरम्यान शासकीय पदाचा गैरवापर करू गोपनीयतेचा व निष्पक्षतेचा भ करत आर्थिक फायद्यासा प्रश्नसंच अनधिकृतपणे ली करण्यात आल्याचे तपास निष्पन्न झाले आहे.

# दुष्काळाच्या संकटात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे -पालकमंत्री अतुल सावे

## पालकमंत्री अतुल सावे यांच्याकडून जिल्ह्यातील विविध गावांतील पीक परिस्थितीची पाहणी



**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला असून, या संकटाच्या काळात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. शेतकऱ्यांनी काळजी करू नये, शासनाकडून सर्वतोपरी मदत केली जाईल, अशी ग्वाही राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी रविवारी दिली.

पालकमंत्री अतुल सावे यांनी आज हदगाव तालुक्यातील जगापूर व तामसा, भोकर तालुक्यातील हळदा व मोघाळी, उमरी तालुक्यातील सोमठाणा, नायगाव तालुक्यातील पळसगाव आणि नांदेड तालुक्यातील तुप्पा येथे भेट देऊन पीक परिस्थितीची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी, विशेषतः महिला शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी व व्यथा जाणून घेतल्या.

राज्य शासन या संकटात शेतकऱ्यांसोबत असून, त्यांना सर्वतोपरी मदत केली जाईल. शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये, शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे, असा धीर देत पालकमंत्री सावे यांनी शेतकऱ्यांना दिलासा दिला. तसेच, सर्व पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळेपर्यंत कर्जमाफीची प्रक्रिया सुरू राहणार असल्याचेही सावे यांनी यावेळी स्पष्ट केले.

जिल्ह्यातील उर्वरित दोन तालुक्यांचाही ट्रिगर-२ अंतर्गत दुष्काळग्रस्त यादीत समावेश करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करून अहवाल घेतला असून, या दोन्ही तालुक्यांचाही समावेश केला जाईल, असा विश्वास पालकमंत्री अतुल सावे यांनी व्यक्त केला.

या पाहणी दौऱ्यात जगापूर व सोमठाणा येथे आमदार बाबूराव कदम कोहळीकर, हळदा व मोघाळी येथे खासदार अशोकराव चव्हाण व आमदार श्रीजया चव्हाण, पळसगाव येथे आमदार राजेश पवार, तर तुप्पा येथे आमदार आनंदराव तिडके-बोंढारकर उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांच्यासह संबंधित तालुक्यांचे उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व तालुका कृषी अधिकारी उपस्थित होते.

# २ ऑक्टोबरपासून सीजेपीचे मुंबईत आंदोलन

**मुंबई (प्रतिनिधी)–** मुंबईत केंद्रीय निवडणूक आयोगाच्या गलथान कारभाराविरोधात कॉकरोच जनता पार्टीकडून आंदोलन करण्यात येणार आहे. २ ऑक्टोबर २०२६ रोजी दादर शिवाजी पार्क येथे आंदोलन करण्याबाबत मुंबई पोलिसांना पत्र देण्यात आले आहे. आंदोलन संविधानाला अनुरूप आणि शांतिपूर्ण होणार आहे, असा उल्लेख शिवाजी पार्क पोलिसांना देण्यात आलेल्या पत्रात केला आहे. कॉकरोच जनता पार्टीच्या राष्ट्रीय संगठन प्रमुख अजिंक्य शिंदे यांच्यावतीने हे पत्र देण्यात आले आहे.

# साडेसोळा कोटींच्या गैरव्यवहाराचा मास्टरमाईंड अखेर पोलिसांच्या जाळ्यात!

## भगवान डवरेला गोव्यातून अटक

**किनवट (प्रतिनिधी)–** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या शासकीय बँक खात्यातून झालेल्या १६ कोटी ३७ लाख ६६ हजार ९१२ रुपयांच्या अपहारप्रकरणी घोटाळ्याचा मास्टरमाईंड भगवान डवरे याच्यासह त्याच्या दोघा साथीदारांना नांदेडच्या स्थानिक गुन्हे शाखेने गोव्यातून अटक केली. अटकेतील आरोपींना किनवटच्या दिवाणी न्यायालयाने



दि.३ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

किनवटच्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील महाघोटाळा आठवडाभरापूर्वी उघडकीस आला. याप्रकरणी गुन्हा नोंद झाल्याची कुणकुण लागताच रोखपाल तथा वरिष्ठ लिपीक भगवान डवरे हा फरारी होता. या संवेदनशील गुन्ह्याचा तपास नांदेडच्या एलसीबीकडे सोपविण्यात आला. त्यानंतर एलसीबीचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय हे गेल्या ७ दिवसांपासून पथकासह किनवटमध्ये तळ ठोकून होते. मिळालेल्या गोपनीय माहितीवरून एलसीबीच्या पथकाने आरोपी भगवान डवरे याच्यासह त्याचे साथीदार निरंजन मिराशे संतोष भडंगे यांना शनिवारी गोव्यातून अटक केली. अटकेतील आरोपींना रविवारी किनवटच्या दिवाणी न्यायालयात हजर करण्यात आले. दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकून न्या. प्रदीप माने यांनी अटकेतील तिघांनाही दि.३ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. दरम्यान, आणखी काही संशयितांना चौकशीसाठी ताब्यात घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. मुख्य सूत्रधार पोलिसांच्या हाती लागल्यानंतर याप्रकरणात प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या गुंतलेल्यामध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने हेक्टरी ५० हजार रुपये मदत द्या; जाचक अटी रद्द करा -आदित्य ठाकरे

**नांदेड (प्रतिनिधी)–** कंधार तालुक्यातील गऊळ येथे शिवसेना ठाकरे गटाचे नेते तथा युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी शनिवारी शेतकऱ्यांशी संवाद साधून खरीप हंगामातील पीक नुकसानीची प्रत्यक्ष परिस्थिती जाणून घेतली.

राज्य शासनाने खरीप हंगाम २०२६ साठी राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये ट्रिगर-१ (प्रथम कळ) लागू केला आहे. त्यामध्ये नांदेड जिल्ह्यातील १४ तालुक्यांचा समावेश असल्याचे शासन निर्णयाच्या वृत्तांमध्ये नमूद आहे. ट्रिगर-१ अंतर्गत विविध सवलती व उपाययोजना लागू करण्यात आल्या असून, पीक नुकसानीची आर्थिक मदत स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे



जाहीर केली जाणार असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे.

या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना तातडीने आणि पुरेशी आर्थिक मदत मिळावी, यासाठी आदित्य ठाकरे यांनी शासनाकडे मागणी केली. पीक नुकसान भरपाईच्या प्रक्रियेत शेतकऱ्यांना अडथळा ठरणाऱ्या जाचक अटी व निकषांचा पुनर्विचार करून ते शिथिल अथवा रद्द करावेत, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी रूपये ५० हजार आर्थिक मदत द्यावी, पीक नुकसानीचे पंचनामे तातडीने आणि पारदर्शक पद्धतीने पूर्ण करावेत, मदत मिळण्याच्या प्रक्रियेतील जाचक अटी व अनावश्यक अडथळे दूर करावेत, पीक नुकसान भरपाईबाबत स्वतंत्र शासन निर्णय तातडीने जारी करावा, शेतकऱ्यांच्या खात्यावर मदत थेट आणि वेळेत जमा करावी, कंधारसह नांदेड जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष नुकसानीचा विचार करून मदत निश्चित करावी या मागण्या यावेळी करण्यात आल्या.

शेतकऱ्यांच्या शेतात पीक नाही, हातात पैसा नाही आणि पुढील हंगामाची चिंता आहे. अशा परिस्थितीत कागदोपत्री सवलतींपेक्षा शेतकऱ्यांच्या खात्यावर प्रत्यक्ष आर्थिक मदत पोहोचणे गरजेचे आहे. शासनाने तातडीने निर्णय घेऊन हेक्टरी रूपये ५० हजार मदत द्यावी आणि जाचक अटी दूर कराव्यात, अशी मागणी या माध्यमातून करण्यात येत आहे.

यावेळी माजी विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, आ. प्रवीण स्वामी, आ. कैलास पाटील, जिल्हाप्रमुख बबन बारसे, पुरुषोत्तम धोंडगे, भुजंग पाटील, महानगर प्रमुख प्रकाश मारावार, तालुका प्रमुख सुनील कदम, उप जिल्हाप्रमुख विजय बगाटे, युवासेना विभागीय सहसचिव महेश खेडकर, सचिन पाटील, सौरभ देवकते, अशोक पावडे, भरत शंभरगावकर आदी उपस्थित होते.




# विराट-शुभमनचे शतक; पहिल्या एकदिवसीय सामन्यात वेस्ट इंडिजविरूद्ध भारताचा मोठा विजय

**तिरूअनंतपूरम (प्रतिनिधी)–** भारत व वेस्ट इंडिज यांच्या तीन एकदिवसीय सामन्याच्या मालिकेतील पहिला सामना भारताने जिंकला आहे. या सामन्यात भारताने ८ विकेट व ५० चेंडू राखून दणदणीत विजय मिळविला. विजयाचे शिल्पकार ठरलेल्या विराट कोहली व कर्णधार शुभमन गिलची शतके ही सामन्यांची वैशिष्ट ठरली.

वेस्ट इंडिजविरुद्धच्या पहिल्या वनडे सामन्यात भारताचा विराट कोहली जबरदस्त फॉर्मात असल्याचं दिसून आला. त्याचा आत्ममविश्वासाचा प्रश्नच नव्हता. रोहित शर्माची विकेट पडल्यानंतर मैदानात उतरला आणि आक्रमक खेळ दाखवला. त्याने कर्णधार शुभमन गिलला उत्तम साथ दिली. तसेच वेस्ट इंडिजच्या गोलंदाजांना विकेटसाठी झुंजवलं.त्याने नुसतं झुंजवलं नाही तर अर्धशतक खेळीसह वनडे क्रिकेटमध्ये एक मैलाचा दगडही गाठला. वनडे क्रिकेटमध्ये मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरनंतर १५ हजार धावा करणारा दुसरा फलंदाज ठरला आहे. विराट कोहलीने या सामन्यात अर्धशतक पूर्ण केलं असून आता शतकाच्या दिशेने कूच केली आहे.

मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने ४६३ वनडे सामन्यात १८४२६ धावांची खेळी केली आहे. आता त्या खालोखाल आता विराट कोहलीचं नाव आलं आहे. वेस्ट इंडिजविरुद्धच्या सामन्यात त्याने १५ हजार धावांचा पल्ला गाठला आहे. वनडे क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये तिसऱ्या क्रमांकावर श्रीलंकेचा माजी क्रिकेटपटू कुमार संगकारा आहे. त्याने ४०४ वनडे डावात १४२३४ धावा केल्या आहे. चौथ्या क्रमांकावर ऑस्ट्रेलियाचा रिकी पॉटिंग असून त्याने ३७५ डावात १३७०४ धावा केल्या आहेत. तर सनथ जयसूर्या १३४३० धावांसह पाचव्या क्रमांकावर आहे. त्याने ४४५ सामन्यात ३२.४ च्या सरासरीने धावा केल्या.

# उत्तर प्रदेशात मुसळधार पावसाचा हाहाकार, १५ जणांचा मृत्यू

**लखनऊ (प्रतिनिधी)–** उत्तर प्रदेशात परतीच्या मान्सूनने रौद्ररूप धारण केले असून गेल्या ४८ तासांत झालेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. पावसामुळे घडलेल्या विविध दुर्घटनांमध्ये तब्बल १५ जणांचा जीव गेला. असून ५ जण गंभीर जखमी झाले आहेत, तर ११७ कच्ची घरे कोसळली आहेत. राज्यातील ६३ जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा कित्येक पटीने जास्त पावसाची नोंद झाली आहे. राजधानी लखनऊसह कानपूर, फरुखाबाद आणि पूर्वांचलमधील अनेक जिल्ह्यांत जलमय परिस्थिती निर्माण झाली असून रस्ते व शेती पुराच्या पाण्याखाली गेली आहे. हवामान खात्याने २८ सप्टेंबर रोजीही अनेक जिल्ह्यांसाठी रेड आणि ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

# दुष्काळवर तीन दिवसीय विशेष अधिवेशन बोलवा, शरद पवारांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्य सरकारने २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला आहे. पण, उर्वरीत तालुक्यांतही स्थिती बिकट आहे. त्यामुळे राज्यात सरसकट सर्वच तालुक्यांत दुष्काळ जाहीर करा. दुष्काळाच्या प्रश्नावर तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलावून, अंमलबजावणीला गती द्या. दुष्काळी मदत दिवाळीपूर्वी वितरीत करा, अशी मागणी ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

सरकारने २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. या संदर्भात शासनाने विविध उपाययोजना जाहीर केल्या आहेत. तथापि, दुष्काळग्रस्त शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी तसेच ग्रामीण भागातील नागरिकांना अधिक प्रभावी आणि तातडीचा दिलासा मिळावा, यासाठी शासन निर्णयामध्ये आणखी काही बाबींचा समावेश होण्याची गरज आहे. उर्वरीत तालुके दुष्काळग्रस्त म्हणून घोषित करण्यात यावेत. संपूर्ण जमीन महसूल माफ करावा.

कर्जमाफी झालेल्या तारखेनंतर आजतागायत ज्या शेतकऱ्यांनी शेती व शेती व्यवसायाशी निगडित घेतलेले सहकारी बँका, राष्ट्रीयीकृत बँका, सहकारी अर्बन बँका आणि पतसंस्था तसेच सामाजिक न्याय, अल्पसंख्याक, आदिवासी विभागाचे वैयक्तिक कर्ज, तसेच फळबागांसाठी घेतलेले कर्ज आणि महिला बचत गटांनी घेतलेल्या कर्जाची रक्कम संपूर्णपणे माफ करण्यात यावी. शेतकऱ्यांच्या कृषी पंपांची सर्व वीज बिले माफ करावे, अशी मागणी पवार यांनी केली आहे.




2491641

Copyright (c) Godateer All Rights Reserved

Powered By Vedanta Software Epaper CMS Cloud